International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No. 6 July – August 2025

# छत्रपती राजाराम महाराजांच्या काळातील पन्हाळ्याची चहा, कॉफी आणि वेलची लागवड: एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप (१९२२-१९४०)

**अमोल जयराम पवार[1] , डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण[2]**

*[1] संशोधक विद्यार्थी, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर*

*[2] इतिहास विभाग प्रमुख, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर*

*Corresponding Author - अमोल जयराम पवार*

**DOI - 10.5281/zenodo.17577428**

**सारांश:**

*या शोधनिबंधातून छत्रपती राजाराम महाराजांच्या कार्यकाळात (१९२२-१९४०) पन्हाळा येथील मसाई पठाराच्या पायथ्याशी चहा, कॉफी आणि वेलची लागवडी संदर्भात झालेला प्रयत्न याची ऐतिहासिक दस्तऐवजांच्या आधारे पडताळणी केली. राजाराम महाराजांनी आधुनिक शेतीला दिलेल्या प्रोत्साहनाचा आणि नव्या पिकांच्या स्वीकृतीचा त्यांच्या काळातील आर्थिक विकासावर काय परिणाम झाला हे समजून घेण्यासाठी हा अभ्यास महत्त्वाचा ठरेल.*

***Keywords:* कोल्हापूर संस्थान, छत्रपती राजाराम महाराज (१९२२-१९४०), चहा, कॉफी, वेलची.**

**प्रस्तावना:**

कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी शाहू महाराजांच्या कृषी आणि सामाजिक सुधारणांचा वारसा पुढे नेणारे त्यांचे पुत्र, छत्रपती राजाराम महाराज यांचा जन्म ३१ जुलै १८९७ रोजी नवीन राजवाडयात झाला.[१] त्यावेळी संस्थानात सर्वत्र आनंदोत्सव साजरा केला होता. पुढे त्यांनी १९२२ ते १९४० या कालावधीत कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार सांभाळला. हा कार्यकाळ अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण ठरला. हा काळ जागतिक महायुद्धे आणि आर्थिक मंदीच्या सावटाखाली असला तरी, स्थानिक पातळीवर विकासाची नवी बीजे रोवली जात होती. राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केलेल्या आधुनिक विचारसरणीला राजाराम महाराजांनी ही पाठिंबा दिला. विशेषत: शेती आणि औद्योगिक विकासाच्या क्षेत्रासंदर्भात, निसर्गरम्य आणि ऐतिहासिक महत्त्व असलेल्या पन्हाळा परिसरात चहा, कॉफी आणि वेलची यासारख्या नगदी पिकांच्या लागवडीचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण आहे. तसेच ब्रिटिश भारतामध्ये २० व्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत चहा आणि कॉफी हे मोठे औद्योगिक पीक म्हणून प्रस्थापित झाले होते. दक्षिण भारतातील अनेक डोंगराळ प्रदेशात याची लागवड मोठया प्रमाणावर होत होती. कोल्हापूर संस्थान एक

प्रगतिशील संस्थानांपैकी एक म्हणून या बदलांपासून अलिप्त नव्हते. राजाराम महाराजांच्या काळात केवळ पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता, आर्थिक समृद्धीसाठी नवीन पर्याय शोधले जात होते. याचा या शोधनिबंधातून आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**१. चहा (Tea):**

पन्हाळ्याच्या घाटमाथ्यावरील मसाई पठाराच्या पायथ्याशी ११ एकर २१ गुंठे जमिनीवर चहा पिकांची लागवड करण्यात आली होती. या जमिनीत २९२३५ चहा रोपाची लागवड केली होती.[२] या चहा पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र आणि रोपांची संख्या सन १९२२ ते १९४० पर्यंत सारखीच होती. मात्र चहा पिकांसासून कमी-अधिक उत्पन्न मिळत होते. उपलब्ध आकडेवारीनुसार खाली उत्पन्न दर्शविले आहे.

**चहा पिकापासून मिळालेले वर्षभरातील उत्पन्न**

| अ. क्र. | वर्ष | चहा पिकापासून मिळालेले वर्षभरातील उत्पन्न |
|---|---|---|
| १. | १९२२-२३ | १८० रू. |
| २. | १९२३-२४ | ३५१ रू. |
| ३. | १९२४-२५ | ४४१ रू. |
| ४. | १९२५-२६ | २९० रू. |
| ५. | १९२६-२७ | २१७ रू. |
| ६. | १९२८-२९ | १४६ रू. |
| ७. | १९२९-३० | १३३ रू. |
| ८. | १९३१-३२ | ३५१ रू. |
| ९. | १९३२-३३ | २६३ रू. |
| १०. | १९३३-३४ | १९४ रू. |
| ११. | १९३८-३९ | २०१ रू. |

(R. A. K. S., 1922 to 1939)[3]

**२. कॉफी (Coffee):**

पन्हाळ्याच्या घाटमाथ्यावरच सन १९२२-२३ या वर्षी ४ एकर १८ गुंठे जमिनीवर कॉफीची (Coffee) लागवड करण्यात आली होती. या जमिनीत २७२० कॉफीच्या रोपाची लागण केली होती. या कॉफी पिकाच्या विक्री पासून कोल्हापूर राज्याला वर्षभरात ५७ रू. मिळाले होते.[४] आणि सन १९२३-२४ यावर्षी याच परिसरात कॉफी लागवडीखालील क्षेत्र २ एकर २० गुंठे आणि ४ एकर १८ गुंठे एवढे क्षेत्र या पिकाखाली होते. या जमिनीत अनुक्रमे १८२० आणि २७२० कॉफी रोपाची लागवड करण्यात आली होती. या कॉफी पिकाच्या विक्रीतून दरबाराला अनुक्रमे ५७ रू. आणि ४ रू. वर्षभरात उत्पन्न मिळाले होते.[५] तसेच

सन १९२९-३० या वर्षी कॉफी लागवडीखालील क्षेत्र २ एकर २७ गुंठे एवढे होते. आणि रोपांची संख्या १३७५ एवढी होती. या वर्षी कॉफी पिकाच्या विक्रीतून वर्षभरात कोणतेही उत्पन्न मिळाले नाही याची नोंद आहे.[६] अशा प्रकारे सन १९२२ ते १९४० या वर्षातील कॉफी, पिकाच्या लागवडी खालील क्षेत्र, रोपांची संख्या आणि वार्षिक उत्पन्न या विषयाची माहिती उपलब्ध आकडेवारीनुसार खाली देण्यात आली आहे.

**कॉफी पिकाची माहिती**

| अ. क्र. | वर्ष | कॉफी लागवडी खालील क्षेत्र | रोपांची संख्या | वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १. | १९२२-२३ | ४ एकर १८ गुंठे | २७२० | ५७ रू. |
| २. | १९२३-२४ | २ एकर २० गुंठे | १८२० | ५७ रू. |
| | | ४ एकर १८ गुंठे | २७२० | ०४ रू. |
| ३. | १९२४-२५ | ४ एकर १८ गुंठे | १८२० | ०४ रू. |
| | | २ एकर २० गुंठे | २७२० | ९२ रू. |
| ४. | १९२५-२६ | ४ एकर १८ गुंठे | २७२० | १४ रू. |
| ५. | १९२८-२९ | ४ एकर १३ गुंठे | २७२० | कोणतेही उत्पन्न मिळाले नाही. |
| ६. | १९२९-३० | २ एकर २७ गुंठे | १३७५ | कोणतेही उत्पन्न मिळाले नाही. |
| ७. | १९३१-३२ | २ एकर २७ गुंठे | २७२० | १९ रू. |
| ८. | १९३२-३३ | २ एकर २७ गुंठे | २७४० | १९ रू. |
| ९. | १९३३-३४ | २ एकर २७ गुंठे | २७४० | ०९ रू. |
| १०. | १९३८-३९ | २ एकर २७ गुंठे | २७४० | कोणतेही उत्पन्न मिळाले नाही. |

(R. A. K. S., 1922 to 1939)[7]

### ३. वेलची (Cardamom):

पन्हाळयाच्या घाटमाथ्यावरच सन १९२३-२४ यावर्षी वेलची लागवडीखालील क्षेत्र १ एकर आणि २२ गुंठे होते. या वेलची पिकाच्या विक्रीतून दरबाराला वर्षभरात २११ रूपये एवढे उत्पन्न मिळाले होते.[८] आणि सन १९२८-२९ या वर्षी वेलची लागवडीखाली १ एकर क्षेत्र होते. आणि या पिकाच्या विक्रीपासून वर्षभरात ३६ रूपये उत्पन्न मिळाले होते.[९] आणि सन १९२९-३० या वर्षी वेलची लागवडीखाली ५ गुंठे क्षेत्र होते. मात्र या वर्षी या पिकापासून कोणतेही उत्पन्न मिळाले नाही.[१०] तसेच सन १९३१-३२ या वर्षी वेलची पिकाखाली ५ गुंठे क्षेत्र होते. या जमिनीत १२० वेलची रोपाची लागवड करण्यात आली होती. या

रोपापासून १६० तोळे उत्पादन निघाले होते. या वेलचीच्या विक्रीतून वर्षभरात १५ रूपये उत्पन्न मिळाले होते.[११] तसेच सन १९३२-३३ यावर्षी वेलची पिकाखाली ५ गुंठे क्षेत्र होते. या क्षेत्रात १३० रोपाची लागण केली होती. यावर्षी रोपापासून ८० तोळे उत्पादन निघाले. आणि या पिकाच्या विक्रीतून वर्षभरात ७ रूपये उत्पन्न मिळाले होते.[१२] तसेच सन १९३३-३४ या वर्षी वेलची पिकाखाली ५ गुंठे क्षेत्र होते. या क्षेत्रात १३० रोपाची लागण केली होती. या वेलची रोपापासून ५७० तोळे उत्पादन निघाले होते. आणि या उत्पादनापासून वर्षभरात ५३ रूपये उत्पन्न मिळाले होते.[१३] आणि सन १९३८-३९ या वर्षी वेलची पिकापासून १५ रूपये उत्पन्न मिळाले होते.[१४]

**समारोप :**

छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील शेतीला आधुनिक स्वरूप देण्यासाठी पन्हाळा घाटमाथ्यावर चहा, कॉफी आणि वेलची पिकांची लागवड केली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि प्रयत्नांमुळे या लागवडी यशस्वी झाल्या आणि संस्थानाच्या आर्थिक विकासाला हातभार लागला. चहा आणि कॉफी लागवडीतून उच्च प्रतीचे उत्पादन मिळाले. त्यामुळे संस्थानला आर्थिक लाभ झाला. महाराजांनी वेलची लागवडीला ही प्रोत्साहन दिल्यामुळे मसाल्याच्या उत्पादनात वाढ झाली. या लागवडीमुळे तत्कालीन वेळी स्थानिक लोकांना रोजगार मिळाला. छत्रपती राजाराम महाराजांच्या या कार्यामुळे पन्हाळ्याची एक कृषी विकास केंद्र म्हणून ओळख निर्माण झाली. पण सध्या ही जागा घनदाट निलगिरीच्या झाडांनी व्यापली आहे. हे ऐतिहासिक कृषी स्थळ महाराष्ट्र शासनाने जतन करणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


१. कांबळे शा. रा., ‘छत्रपती राजाराम महाराज जीवन कार्य’, मीरा प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, २०१३, पृ. २२.
२. Report On The General Administration Of The Kolhapur State, 1923-24, P. 50.
३. R. A. K. S., 1922 to 1939.
४. R. A. K. S., 1922-23, P. 40.
५. R. A. K. S., 1923-24, P. 50.
६. R. A. K. S., 1929-30, P. 25.
७. R. A. K. S., 1922 to 1939.
८. R. A. K. S., 1923-24, P. 50.
९. R. A. K. S., 1928-29, P. 24.
१०. R. A. K. S., 1929-30, P. 25.
११. R. A. K. S., 1931-32, P. 57.
१२. R. A. K. S., 1932-33, P. 55.
१३. R. A. K. S., 1933-34, P. 81.
१४. R. A. K. S., 1938-39, P. 75.